# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २५/२००९/ दिनांक :

श्रीमती लक्ष्मीबाई गणपती पाटील,
मु. बेनिक्रे, पो. हळदी, ता. कागल, अर्जदार
जि. कोल्हापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभाग २, कोल्हापूर.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय मुरगुड, जि. कोल्हापूर

**<u>कोरम</u> :-** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ११.०६.२००९

श्रीमती लक्ष्मीबाई गणपती पाटील, मु. बेनिक्रे, पो. हळदी, ता. कागल, जि. कोल्हापूर (ग्रा.त.नि.मं. तक्रार प्रकरण क्र. २५/०९ ) यांनी तेथे शेती वीज पंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज केला आहे. तथापि, तक्रारदार यांचे प्रकरणास मंजुरी मिळणे व कोटेशन मिळणेस विलंब झाला. अद्यापपावेतो वीज जोडणी मिळाली नाही, वि.प.चे अधिकाऱ्याकडून काम होणेस लाच मागणी व त्रास दिला गेला. झालेल्या आर्थिक भुर्दंडापोटी नुकसान भरपाई रक्कम मिळावी अशी तक्रारदार यांची मागणी आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांजकडे क्ष नमुन्यात दि. २९.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली होती. त्यावर कक्षाने आदेश पत्र क्र. ७१२ दि. २९.१.२००९ ने दिलेला निकाल मान्य झाला नसलेमुळे तक्रारदार यांनी ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दि. १.४.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने वि.प.चे सबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारीसंबंधी मुद्देनिहाय म्हणणे मागविले व सुनावणीची तारीख ८.६.२००९ ठरविण्यात आली व त्यानुसार सुनावणी पार पडली.

सुनावणीवेळी तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री. मारुती पाटील, वि.प.तर्फे श्री. शिंदे, कार्यकारी अभियंता, श्री. हजारे, सहाय्यक अभियंता, कोल्हापूर ग्रामीण विभाग तर श्री. मांनके, सहाय्यक अभियंता, मुरगुड उप विभाग इ. हजर होते.

तक्रारदार यांचे म्हणणे

तक्रारदार श्रीमती लक्ष्मीबाई गणपती पाटील यांनी वर नमूद ठिकाणी ठिकाणी ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीजजोडणी मिळणे करीता दि. ६.१०.२००८ ला अर्ज केला आहे. त्यानंतर चार महिन्याचे कालावधी उलटून गेलेवर तसेच अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केलेवर प्रकरणास मंजुरी मिळाली. कोटेशन दि. २१.२.२००९ ला मिळाले व कोटेशन दि. २४.२.२००९ ला भरले. त्यात मानसिक त्रास सहन करावा लागला. तक्रारदार यांचे शेतात वीज लाईनचे खांब अस्तित्वात असून त्यावरुन इतर शेतकऱ्यांच्या शेतीपंपाच्या वीज जोडण्या चालू आहेत. त्याच खांबावरुन अथवा सध्याच्या ६३ केव्हीए ट्रान्सफॉर्मरवर भार शिल्लक नसलेस १०० केव्हीए क्षमते ट्रान्सफॉर्मर त्या जागी बसविणेत यावा व वीज जोडणी मिळावी व या कामास एलटी लाईन उभीकरणे किंवा गावठाण फिडरचा कांही संबंध येत नाही.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने त्यांचे निकालावेळी उपस्थित राहणेस फोनवर निरोप किंवा पत्र जाणूनबूजून दिलेले नाही व नंतर चौंकशी करीता गेलो असता निकालाची माहिती दिली गेली. कक्षाचे क्ष निकालपत्रातील निकाल आम्हास मान्य नसून निकालपत्रातील नमूद माहिती चूकीची आहे. वि.प.चे मुरगुड उप विभागाचे सहाय्यक अभियंता श्री. मानके यांनी सदर शेतीपंप जोडणी देणे करीता रु. २०,०००/–ची लाच रकमेची मागणी करुन आमची मानसिक, आर्थिक पिळवणूक करुन त्रास दिला आहे. त्याची चौंकशी करुन त्यांना निलंबित करुन कठोर कारवाई करावी. तसेच शेती वीज पंपाची जोडणी न मिळालेमुळे शेतीपीकाची झालेली नुकसान भरपाई रु. २१,५००/– मिळावी व त्वरीत शेती पंपाची वीज जोडणी मिळावी.

वितरण कंपनीचे म्हणणे

वितरण कंपनीने म्हणणे मांडतांना सांगितले की, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारदाराचे तक्रारीवर दि. २०.१.२००९ ला सुनावणी ठेवली होती. पत्र क्र. १८८ दि. १२.१.२००९ ने तक्रारदारास उपस्थित राहणेस कळविले होते. तक्रारदार हजर राहिले नाहीत. कक्षाचे निकालात, कक्षाने शेतीपंपाचे वीज कनेक्शन एसपीए योजेत मंजूरी देणेस व शेतीपंप जोडणी करीता कोटेशन भरलेल्या अर्जदारांचे प्रतीक्षा यादीनुसार जोडणी देणेस सुचविले. प्रकरणात ग्राहकाचा अर्ज दि. ६.१०.२००८ ला दाखल झाला व मंजुरी दि. १६.२.२००९ रोजी दिली. कोटेशन दि. २१.२.२००९ ला दिले ते ग्राहकाने दि. २४.२.२००९ ला भरले.

सदर मंजूर प्रकरणात ०.३ कि.मी. ११ केव्ही वाहिनी व १ x ६३ केव्हीए रोहित्र व एलटी लाईन १.५६ कि.मी. इ. कामांचा समावेश आहे.

सध्याचे रोहित्र ६३ केव्हीएचे असून जोडलेला ५५ अश्वशक्ती व मंजूर ५ अश्वशक्ती मिळून ६० अश्वशक्ती भार होतो. त्यामुळे तक्रारदार व्यतिरिक्त इतर ४ वीज जोडणी मागणी करणारे अर्जदाराचे मिळून एकत्रित स्वतंत्र रोहित्र उच्च व लघुदाब वाहिनचे कामाचा समावेश असलेले प्रकरण बनवून मंजुरी दिली आहे.

त्यामुळे ग्राहकाचे विहीरीजवळ सध्या लघुदाब खांब असलातरी त्यापासून जोडणी देणे शक्य नाही. चालू रोहित्राचे ठिकाणी जादा क्षमतेचा रोहित्र बदल/ बसविणेस एसपीए योजनेखाली ग्रामीण विद्युतीकरण प्राधिकरणाकडून मंजुरी दिली जात नाही. त्यामुळे स्वतंत्र जादा रोहित्र मंजूर करणेशिवाय पर्याय नव्हता.

सध्या वि.प.तर्फे शेतीपंप जोडणी करीता दि. ३१.३.२००८ पर्यंत रक्कम भरलेल्या अजदाराची प्रतीक्षा यादीनुसार कामे चालू आहेत व तक्रारदाराचे यादीतील क्रमांकानुसार काम होईल असे सांगितले. तक्रारदाराकडे वि.प.चे अधिकाऱ्यांनी रु. २०,०००/– ची लाच मागितली या मुद्द्यात तथ्य नाही तसेच त्यास पुरावा नाही.

सदस्य सचिव यांचे निष्कर्ष

तक्रार प्रकरणाचा आढावा घेतांना वितरण कंपनीकडून तेथील सध्याचे रोहित्रावरील नवीन जोडणी देण्याची मर्यादा/ क्षमता संपली असलेमुळे व तक्रारदार समवेत इतर ४ नवीन शेतीपंप जोडण्याचे मागणी अर्ज एकत्रित करुन३५ अश्वशक्ती करीता जादा उच्चदाब व लघुदाब वाहिन्या अनुक्रमे ०.३ कि.मी. व १.५६ कि.मी. लांबीच्या व एक रोहित्र ६३ केव्हीए प्रकरण क्षमतेचे मंजूर केलेचे म्हणणे मांडले आहे. तक्रारदाराचा नवीन वीज जोडणीचा अर्ज दि. ६.१०.२००८ ला वि.प.कडे दाखल आहे. त्यास दि. १६.२.२००९ रोजी मंजुरी मिळाली व कोटेशन दि. २१.२.२००९ रोजी रोजी देणेत आले. सबब सदर विलंबापोटी महाराष्ट्र वीज नियामक आयोग कृती मानके विनियम २००५ परिशिष्ट अ नुसार दि. ५.११.२००८ पासून पुढे दि. २१.२.२००९ काळाची नुकसान भरपाई १६ आठवडे x रु. १००/–प्रमाणे रु. १६००/– नुकसान भरपाई देणे क्रमप्राप्त व योग्य ठरते.

तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग कृती मानके विनियम २००५ नुसार वीज पुरवठा जोडणीचे कामात उपकेंद्र/ रोहित्राचा समावेश असलेने १ वर्षाचे मुदतीत काम करणेत यावे.

वितरण कंपनीकडून शेतीपंप वीज जोड्णया मागणी करीता रकमा रलेल्या अर्जदारासंबंधी जेष्ठता यादी ठेवण्यात आलेचे व त्यानुसार दि. ३१.३.२००८ पर्येत रकमा भरलेल्या प्रक़रणांची कामे क्रमांकानुसार चालू आहेत. या बाबत तक्रारदार यांचा क्रमांक सदर यादी किती क्रमांकावर आहे हे वि.प.ने तक्रारदार यास कळविलेले नाही.

तक्रारदार यांनी शेतीपंपाची वीज जोडणी मिळाली नाही व त्यामुळे पीकांचे नुकसान झाले यास्तव भरपाई रक्कम मागणी केली आहे. त्याची भरपाई कशी व किती याचा हिशोब सादर केलेला नाही. त्यामुळे सदर मागणी विचारात घेता येणार नाही.

तक्रारदार यांनी वि.प.चे अधिकाऱ्यांनी सदर जोडणीचे काम करुन देणेकरीता रु. २००००/– लाच रकमेची मागणी केली तसेच वीज जोडणी देणेकामी वि.प.चे अधकिाऱ्यांनी मानसिक, आर्थिक पिळवणूक करुन त्रास दिलेने वि.प.चे अधिकाऱ्यांची चौंकशी करुन निलंबित करावे. कडक कारवाई करावी. या आरोपा बाबत स्पष्ट करणेत येते की, सदर मुद्दे मंचाचे अखत्यारीत येत नाहीत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, युक्तीवाद, पुरावे, उपलब्ध कागदपत्रें इ. विचारांत घेऊन सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांजकडून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

**आदेश**

१) तक्रारदारास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग कृती मानके २००५ आधीन राहून त्याचे अर्जाचे तारखेपासून १ वर्षाचे आत प्रथम येईल त्यास प्रथम तत्वावर शेतीपंप वीज जोडणी द्यावी.

२) तक्रारदार यांचे शेतीपंपास कोटेशन भरलेल्या अजदाराचे यादीतील जेष्ठता क्रमांक कळविणेत यावा.

३) तक्रारदार यांना वीज जोडणी करीता मागणी अर्ज केलेपासून कोटेशन मिळणेस झालेल्या विलंबापोटी

१६ आठवडे x रु. १००/– प्रमाणे रु. १६००/– नुकसान भरपाई देणेत यावी.

४) पीक नुकसानीचे भरपाई बाबत आदेश नाही.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ०१.०७.२००९

( एस.आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :